कर्मचारीवर्ग शाखा
परिपत्रक क्र. ३२ /९५.

क्र. राप/आस्था/२२०-ए/६९३२
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक : १४, सप्टेंबर, १९९५.

उप महा व्यवस्थापक [अपिल],
रा. प. पुणे.

विशेष कार्य अधिकारी [अपिल], रा. प. पुणे.

प्रादेशिक व्यवस्थापक, रा. प. मुंबई / पुणे / नाशिक / अमरावती /
औरंगाबाद / नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक, रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद /
नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण], रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

मुख्य सल्लागार, संस्थांतर्गत व्यवस्थापन सल्लागार, रा. प. भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक, रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई / धुळे / जळगांव / नाशिक /
पालघर / रायगड [पेण] / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर /
कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना /
लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / अकोला / भंडारा / बुलढाणा /
चंद्रपूर / वर्धा / यवतमाळ.

कार्यकारी अभियंता, रा. प. औरंगाबाद / धुळे / कोल्हापूर / नागपूर / पुणे /
परभणी / कुर्ला / अकोला / बारामती.

विषय : रा. प. कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या विशेष रजेचा कालावधी
हा कार्यकाल समजून त्यावर अर्जित रजा देणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १] राप/आस्था/२२०-ए/७८२२
दि. २६.११.९४ क्र. २] राप/आस्था/२२०-ए/३८९२
दि. .९५.

....

वरील परिपत्रकांतील सूचनांचा फेरविचार करून त्यात खालील प्रमाणे सुधारीत सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

१. प्रसुती / गर्भपात यासाठी सेवा विनियम १०२-अ अन्वये देण्यात येणारी रजा ही सरासरी वेतनावरील रजा म्हणून दिली जात असते. म्हणून सेवाविनियम १५ नुसार त्या रजेच्या कालावधीवर रजा अर्जित होऊ शकते. तरी, प्रसुती / गर्भपात रजेवर रजा अर्जित होईल या सूचना पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात राहतील. संदर्भित परिपत्रकांच्या सूचनांनुसार त्या रजेची कपात केली असल्यास कपात केलेली रजा परत संबंधित महिला कर्मचाऱ्याच्या रजा हिशेब खात्यात जमा करावी. वरील प्रमाणे कार्यवाही फक्त सेवा विनियमांच्या परिशिष्ट - "ब" खाली येणाऱ्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत करावयाची आहे. काही महिला कर्मचारी रोजंदारी सेवा विनियम १४-अ व परिशिष्ट "अ" मध्ये गणल्या जातात. त्यांच्या बाबतीत त्यांना दिलेल्या प्रसुती / गर्भपात रजेवर रजा अर्जित होणार नाही याची नोंद घ्यावी.

२. मात्र क्षयरोग, कॅन्सर, पक्षाघात यासाठी खासरजा मिळत असल्यामुळे त्यासाठी दिलेल्या रजेवर रजा अर्जित होणार नाही. तरी, अशा प्रकरणी पूर्वी खास रजेच्या कालावधीवर रजा दिली असेल तर त्याची रजा वजा करण्याच्या सूचना अंमलात राहतील.

-२-